The journal has been uploaded in UGC CARE PORTAL. (RTI)
http://www.epitomejournals.com Vol. 7, Issue 8, August 2021, ISSN: 2395-6968

Epitome : International Journal of Multidisciplinary Research
ISSN : 2395-6968

# BHARTIYA MAHILANCHE EHTIHASIK JEEVAN



Dr. Narwade Jalba Meshram

Arts, Science & Commerce College, Badanapur

Dist. Jalana

# "भारतीय महिलांचे ऐतिहासिक जीवन"

डॉ. नरवाडे जळबा मेश्राम
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, बदनापूर,
जि. जालना

प्रस्तावना :

मानव हा समाजशिल प्राणी आहे. समाजाचा तो अविभाज्य घटक आहे मानवाला जगण्यासाठी व व्यक्तिमत्व विकासासाठी हक्कांची आवश्यकता असते. हे अधिकार माणसाला जन्मताच प्राप्त झाल्याने कुणीही ते हिरावून घेउ शकत नाही, 20 व्या शतकापासून मानवी हक्काशिवाय कुणीही चांगल जिवन जगण अशक्यप्राय आहे.

आज विकसनशिल राष्ट्रामध्ये ज्या समस्या आहेत त्यात महिला संदर्भात समस्या मोठ्या प्रमाणात आहेत. भारतातील महिलांना समाजात दुय्यम स्थान आहे. हा समस्येचे कारण आहे. एकीकडे महिलांना देवी म्हणायचे आणि दुसरीकडे त्यांच्या गर्भातच हत्या करण्याचा असं दुतोंडी सारख वागणं भारतीय समाजात पहायला मिळते.

महिला आणि मानवी हक्क

1. मुलगी म्हणजे दावणीला बांधलेली गाय,
   जेथे न्याल तेथे जाय।
2. लेकीचा ग जलम भाड्याचा बैल,
   कधी इसावा होईल देवा ठाव।
3. ढोल, गवार, शुद्र, पशु अरू, नारी
   यह सब है ताडन के अधिकारी।

अशा म्हणी आणि वाक्य प्रचारांच्या पगड्यत अडकलेला व बुरसटलेला समाज आजही स्त्रियांना गुलाम समजण्याच्या मानसिकतेतून बाहेर पडत नाही. हे कितीही नावडते असले तरी हे सत्य आहे. अशा काळात प्राप्त परिस्थितीत महिला त्यांचे मुलभूत अधिकार वापरत आहे का? किंबहुना त्यांना त्याचें अधिकार

महित असावेत काय? शासनाला योजना पोहचत असाव्यात काय? प्राचिन काळी आपली आबरु वाचवून जोहर करणा–या महिला आजही तशाच मानसिकतेतून स्वतःला संपविण्यासाठी प्रयत्न करतात काय? अशा अनेक पडलेल्या समाजातील महिला संदर्भातील प्रश्नांची चर्चा करण्यासाठी प्रस्तुत ठिकाणी शोध पत्रिका लिहिल्या मागील हेतू आहे. प्रा. एच केलास्की यांच्या मते "हक्क म्हणजे सामाजिक जीवनाची अशी परिस्थिती होय की ज्याच्या शिवाय व्यक्तीला समानता स्वतःचा सर्वांगीन विकास करून घेणे शक्य होत नाही."

भारतीय स्वांतत्र्यानंतरही महिलांचा समस्या कमी झल्या नाहीत. भारतीय समाजात आजही अनिष्ट चालीरीती, अधंश्रध्दा दिसून येतात. देव व दैव यावर विश्वास ठेवणा–या पुरूष प्रधान भारतीय समाजात स्त्रियांवर अन्याय होतांना दिसतात.

महिलांवर होणा–या हिंसाचाराचे प्रकार :

1. स्त्री भृण हत्या आपल्या देशात एकीकडे आपण महिलांना देवीचा दर्जा देता तर दुसरीकडे त्यांचा जन्मच होउ नये या साठी त्याची गर्भातच हत्या करतो.गर्भ जल परीक्षण करून त्यात जर मुलींचे लिंग निदान झाले तर मग तिथे या जगात येण्याचे दरवाजे बंद केले जातात. स्त्री–पुरूष असमानता पुन्हा महिलांवरच्या अत्याचारात भरच घालते.
2. हुंडा पध्दती : स्त्रीभृण हत्या या समस्येला असलेल्या ब–याच कारणापैकी हेही एक कारण आहे. भरपूर जोरात लग्न द्या त्याचबरोबर घर, गाडी,पैसे, दागिने मागीतले जातात. ह्या सर्व प्रकारामुळे स्त्रियांना त्रास दिला जातो. दरवर्षी 6000 च्या वर महिलांचा मृत्यू हुंड्यासाठी होणा–या छळामुळे होतो.
3. बाल विवाह : आपल्या देशात बाल विवाहाची आजही समस्या काही राज्यात जाणवते. विशेषतः ग्रामीण भागात ह्या समस्या जाणवत असल्या विवाह मुले मुली लहान वयातच माता बनतात. किंवा लहान वयातील बाळंतपण त्याचा मृत्यू होतो.

4. बलात्कार, लैगिंक छळ सर्व समस्यांवर सध्या ह्या समस्येने भीषण स्वरूप प्राप्त केले आहे. कोणतेही वर्तमान पत्र हातात पेसे घेतले तर बलात्कार न झाल्याची बातमी नाही असे होत नाही. भारतात 1996 ते 1998 मध्ये झालेल्या बलात्काराच्या संख्येवरून असे अनुमान निघते की दर तासाला भारतात 07 बलात्कार होतात. दर वर्षी 15000 बलात्काराची नोंद भारतात होते. निरनिराळ्या कार्यालयात काम करणा–या महिलांना विनय भंग अश्लील खाणा खुणी, अवमान यांचा सामना करावा लागतो. नोकरी सोडल्यास घर खर्च कसा चालवायचा या भितीने त्या सर्व अत्याचार निमूटपणे सहन करतात.
5. स्त्रियांचे धर्मातील स्थान :

भारतीय स्त्रीचे धर्मातील स्थान ह्याबाबत लिहायचे झाले तर त्यातही फार विविधता आहे. हिंदु, शिख, मुस्लीम, ख्रिस्त या सर्वांच्या धार्मिक पुस्तकात डोकावले असता अतिशय वेगवेगळ्या बाबी आढळून येतात.हिंदू धर्मात मनुस्मृतिचा प्रभाव दिसू न येतो. त्याबाबतीत स्त्रियांना कोणतेही अधिकार दिलेले दिसून येत नाहीत. पुराण काळात धार्मिक सनातनी विचार सरणीमूळे स्त्रियांना उंब–यांच्या आतच ठेवण्यात धन्यता मानण्यात येत होती. स्त्रियांनी एक पतित्व स्विकारावे परंतु पुरूषांनी अनेक विवाह केल्यास ते सर्व मान्य होते. योनी सुचिता आजही महत्वाची मानली जाते. त्यांच्या पवित्रतेसाठी त्यांना अग्नी परीक्षेतून जावे लागते. पुरूषांना कोणत्याच धर्मात अग्नी परीक्षा द्यावी लागत नाही. स्त्रीच्या देवी रूपाला सर्वत्र मान्यता होती परंतु घरातल्या जिवंत स्त्रीला तो मान नव्हता.

महिला आयोग व मानवी हक्कांची संकल्पना :

भारतात राष्ट्रीय महिला आयोगांची स्थापना राष्ट्रीय महिला आयोग अधिनियम 1990 नुसार 31 जानेवारी 1992 रोजी करण्यात आली सदर आयोग हा सविधानिक आयोग असून या आयोगात एक अध्यक्ष व पाच सदस्य असतात. त्याची निवड केंद्र सरकार करते यात अनुसूचित जाती व व जमातीची कमीतकमी एक महिला सदस्य असणे आवश्यक आहे सदर आयोगमार्फत महिलांसाठी कार्य शाळा व शिबीरे घेतली

जातात. महिला हक्क विषयी जागृती केली जाते. व्याख्याने आयोजित केली जातात. गरजू महिलानां समुपदेशाची उपलब्धता करून दिले जाते. नविन कायद्याची निर्मीत व जुन्या 3 महिलांशी संबंधीत कायदे कायद्यामध्ये दुरूस्ती करणे त्याबाबत सूचना करण्याचे काम सदर आयोग करतो. वैवाहिक प्रकरणे हुंडा, बलात्कार, मानसिक छळ व तत्सम तक्रारी दाखल करून घेतल्या जातात. त्यावर सुनावण्या करून त्यांना न्याय दिला जातो. महिलांना आवश्यकतेनुसार वैद्यकीय शैक्षणिक मदत सुविधा दिली जाते.

महिलांशी संबंधीत कायदे :

भारताचे संविधान समता, बंधुता आणि न्याय, स्वांतत्र्य या पायावर उभे आहे.

भारतीय संविधानाने दिलेल्या अधिकारांचा वापर करण्यासाठी संसदेने निरनिराळे अधिनियम बनविले व भारतीय न्याय प्रणाल ते राबविण्याचे काम करत आहे.

1. विवाहसबंधी कायदे – हिंदू विवाह कायदा 1955, हिंदू कायदा पुनर्विवाह कायदा 1956, आनंद विवाह कायदा 1909, आर्य विवाह कायदा 1892, मुस्लीम विवाह कायदा, मुस्लीम स्त्री घटस्फोट हक्क व सरंक्षण कायदा 1986, खिस्ती विवाह कायदा 1892, विशेष विवाह कायदा 1866, हिदू दत्तक व निर्वाह कायदा 1956.

2. मालमत्ता संबधी कायदे – हिंदू उत्तराधिकारी कायदा 1956. विवाहित स्त्रियांचा संपत्तीचा कायदा 1959. हिंदू, खिश्चन, पारशी, मुस्लीम स्त्रियांना

3. फौजदारी कायदे – स्त्रियांचे अश्लील प्रदर्शन प्रतिबंध कायदा 1961, बाल विवाह निर्बंध कायदा 1929, कौंटुबिक हिसांचार प्रतिबंधक कायदा 2005, महाराष्ट्र नरबळी, अघोरी प्रथा व जादूटोना प्रतिबंध कायदा 2013 , गर्भ धारणा पूर्ण आणि जन्म पूर्व निदान तंत्र (लिंग निवड प्रतिबंध) कायदा 1994.

4. कामगार स्त्रियांचे अधिकार विषयक कायदे :

मातृत्व लाभ संबंधीचा कायदा 1961, कारखाने कायदा 1948 खाण कायदा, किमान वेतन कायदा 1948.

स्त्रीयांचे जवळपास निम्मेप्रमाणे लोकसंख्येमध्ये आहे. पुरूषांच्या खाद्‌याला खांदा लावून सन्मानाने जीवन जगण्यासाठी जागतीक स्थरावर प्रयत्न चालूच आहेत. त्याचप्रमाणे भारतीय स्त्रीयांना आपले स्वातंत्र्य उपभागता यावे तसेच ती स्वावलंबी व्हावी याकरीता शासनस्थरावर प्रयत्न निरंतर चालू आहेत. महिलांना त्यांच्या हक्कांची जाणीव करून देवून त्यांना सबलीकरणाच्या प्रवाहात आणने हा शासनाचा हेतु राहिला आहे.

महिला सबलीकरणाच्या योजना व कार्यक्रम

महिलांना हक्क दिले म्हणजे अपाली जबाबदारी संपली असे नाही. हक्क आणि त्यांची योग्य अंमलबजावणी जितकी गरजेचे आहे तितकेच महिलांना सक्षम करणेही महत्वाचे आहे. महिलांचे सबलीकरण व त्यांच्यासाठी शासनातर्फे राबविल्या जाणा—या योजना आणि योग्य सांगड घातली तर महिलांच्या प्रगती मध्ये चांगली भर पडेल.

1. महिलांना प्रशीक्षण व रोजगार सहाय्यता कार्यक्रम, केंद्रीय क्षेत्र योजनेच्या स्वरूपात 1987 साली सदर कार्यक्रम भारत सरकार ने चालू केला. यात कृषी, पशुपालन, दुग्ध व्यवसाय, मत्स पालन, हातमाग, हस्तकला, खाडी व ग्रामोद्योग, रेशीम किडे पालन या पारंपारिक क्षेत्राचा अंतर्भाव करण्यात आलेला आहे.

2. स्वयं सिध्दा — पुर्वी ही योजना इंदिरा गांधीयांच्या नावाने राबविली जात होती. महिलांना समाजिक व आर्थिक द्रष्ट्या प्रगत बनविणे हा योजनेचा मुळ उद्देश आहे. यात महिलांचे स्वयं सहायता गट तयार केले जातात. महिलांचे आरोग्य, त्यांचे राहणीमान, सकस आहार शिक्षण, स्वच्छता, कायदेशीर हक्क या बद्दल जागृती आणि विश्वास निर्माण करण्याचे कार्य केले जाते.

याच प्रमाणे बालिका समृध्दी योजना 2 ऑक्टोंबर 1997 रोजी चालू करण्यात आली. तात्पूरती निवारा गृहे ही योजना 1969 साली सूरू करण्यात आली. कौटूंबिक तणाव, समाजाने वाळीत टाकलेल्या, निराधार महिलांना, बालकांना येथे राहण्याची सोय करून देण्यात येते.

कुटूंब सल्ला केंद्र, स्त्रियासाठी वसतिगृहे, अल्प मुदतीचे अभ्यासक्रम अशा निरनिराळ्य योजनांच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्याचे पर्याय अवलंबिले जात आहेत.

समारोप –

प्राचिन काळापासून स्त्रीयांवर अन्याय होतांना दिसतात स्त्रि हि अबला आहे . असा पुरूषांचा आग्रह असल्याने स्त्रियांच्या हक्कांचा गळचेपी होतांना दिसते आहे. म्हणूनच आंतरराष्ट्रीय स्थरावर महिला आयोग स्थापन झाला त्याप्रमाणे महिलांच्या हक्कासांठी राष्ट्रीय स्थरावर महिला आयोगांचे स्थापन झाली आहे. अंधश्रध्दाळू भारतीय समाजात अघो–या प्रथा परंपरा, अनिष्ठ चालीरिती पाहावयास मिळतात. भारतीय समाज व्यवस्था पुरूष प्रधान असल्यामुळे अशिक्षित स्त्रीयांवर अन्याय होतो असे नाही तर शिक्षीत स्त्रीयांचाही अनेक संख्याना सामोरे जावे लागत आहे. मानवी अधिकारांचे व्हावे म्हणून कायदे, आयोग शासन, प्रशासन सेवाभावी संख्या इत्यादी माध्यमातून प्रयत्न चालू आहेत. त्यामुळे बरेच प्रश्न कमी झाले आहेत. परंतु काही प्रश्न अत्यंत ज्वलंत रूप धारण करतांना दिसतहित' त्याकरिता स्त्रीयांप्रती पुरूषांची जी मानसिकता आहे ती प्रथम बदलण्याची गरज आहे. कारण नियम, कायदे बनविणारा माणूस आहे तर मोडणार नाही माणूसच आहे.

संदर्भग्रंथ :

1. शर्मा मंजू : 'नारी के प्रति अत्याचार एवं मानवधिकार, मार्क पब्लिशर्स, जयपूर, प्रथम संस्करण, 2009.

2. रघुवंशी राजेश : 'महिलांसाठी अत्यावश्यक कायदे' आयुविद्या मुद्रणालय,पुणे, 2008

3. गीताली मंदाकिनी : स्त्री प्रश्न सोडवितांना, दिलीप राज प्रकाशन, प्रा.लि.पुणे, 2007.

4. कुरूंदकर नरहर : मनुस्मृती, इद्रांयणी साहित्य, पुणे 1992.

5. जोगळेकर मृणालिणी :स्त्री अस्मितेचा अविष्कार, 19 वे शतक भाग .1, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई 1991.